जा.क्र./नसका/स्थायी/CR-६०/२०१४.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- २६.०२.२०१४

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**स्थायी समितीच्या सभेची सूचना**
**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण -२ मधील नियम क्र.३ (अ) अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र ३ (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि.२८.०२.२०१४, दु.०३.३० वा.** नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

Sd/-
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.

Sd/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**

______________________________

**श्री/श्रीमती**
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.१**

स्वातंत्र्य सैनिक कॉलनी उद्यान व सुंदर नगर उद्यान येथे पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे तातडीने बोरवेल घेऊन पाण्याची उपलब्धता करण्यात आली. स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे विंधन विहिर घेऊन त्यावर पंप बसविण्यात आले व या कामसाठी खर्च रूपये ७४,६१९/- इतका लागलेला आहे. तसेच सुंदर नगर येथे अस्तित्वात असलेल्या विंधन विहिरीवर पंपाची व्यवस्था करण्यात आली या कामासाठी रूपये ३५,५५७/- इतका खर्च झालेला आहे. सदर काम कंत्राटदार मो. अथर शे. चाँद यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात आले. सदर रक्कम एकूण रुपये १,१०,१७६/-(एक लक्ष दहा हजार एकशे शहात्तर रूपये) च्या कायोत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड जलशुध्दीकरण काबरानगर येथील पिव्हर वॉटर पंपाचे सक्शन पाईप दुरुस्तीचे काम ६ द.ल.ली. क्षमतेच्या केंद्रावरील पिव्हर वॉटर पंप १७० अश्वशक्तीचे सेन्ट्रीफ्युगल मोनोब्लॉक असून, या पंपाची उभारणी सन १९९५-९६ मध्ये झाली होती. या पंपाच्या सक्शन बाजू कडील पाईप क्लोरीनच्या संपर्कामुळे गंजले असून वारंवार कळती होत असल्यामुळे पंपाच्या कार्यक्षमतेवर फरक पउत आहे. यासाठी वेल्डींगद्वारे दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला असता तात्पुरत्या स्वरुपात प्रश्न सुटत असून, वारंवार गळती आढळूण येत आहे. त्या करीता नव्याने पाईप बदलने आवश्यक असल्यामुळे म.जि.प्रा. च्या चालू दरसूची नुसार रू. ६,३०,९००/- चे अंदाजपत्रक तयार करून त्यास आयुक्त यांनी कार्यालयीन आदेश क्र.१२५३२ दि.१६ सप्टेंबर २०१३ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील काम तातडीने होणे आवश्यक असल्यामुळे रास्त अंदाजपत्रक दावर मे. इंद्रजा कंन्सट्रक्शन उस्मानाबाद यांच्या कडून करून घेण्यात आले. त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान करणे करीता प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.३**

विषयः- साल सन २०१४-१५ चा मालमत्ता कर अग्रीम कर भरणारास सुट व उशीरा कर भरणारास शास्ती लावणे कर आकारणीस पात्र संयंत्र निश्चीती बाबत.

संदर्भः- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४० अ व ४१(१) व प्रकरण ८ कलम ७(२)

मालमत्ता कर वसुली साधारणतः माहे ऑगस्ट पासुन होत असते, परंतु मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेस करात सुट व शास्ती लावण्याची तरतुद उपलब्ध असुन जया कालावधीत महापालिकेस प्राप्त निधीचे इतर स्त्रोताचे पुरेस उत्पन्न प्राप्त होत नाही, त्याकालावधी सुट देऊन व थकीत रक्कमेवर शास्ती लावली तर मालमत्ता कर व अनुषंगीक कर वसुली इष्टांक पुर्ण होण्यास मदतीचे ठरेल, त्याकरीता सालन सन २०१४-१५ ची मालमत्ता करावर खाली कालावधी समोर दर्शवलयानुसार कराचा भरणा केला तर सुट व शास्ती लावण्यात येते,

| अनु. क्र. | कालावधी | सन २०१४-१५ च्या मालमत्ता करात सुट | सन २०१४-१५ देय सर्व करावर शास्ती |
|---|---|---|---|
| १ | माहे एप्रिल २०१४ ते जुन २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर १० टक्के | थकीत रक्कमेवर दर महा २ टक्के शास्ती, रक्कम अदा करे पर्यत |
| २ | माहे जुलै २०१४ ते सप्टेबर २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर ७ टक्के | |
| ३ | माहे ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१४ | पुर्ण वर्षाचा कर भरणा केला तर ५ टक्के | प्रथम सहामाही देय रक्कमेवर दरमहा २ टक्के शास्ती, |
| ४ | माहे जानेवार २०१५ ते मार्च २०१५ | ० | पुर्ण देय रक्कमेवर दरमहा २ टक्के शास्ती, रक्कम अदा करे पर्यत |
| मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२-(१) अ नुसार या नंतर थकबाकीवरील शास्ती माफी योजना घोषीत करून नये, कारण त्यामुळे नियमीत करदाते व थकीत कर ठेवणारे यामध्ये काही अंतर राहत नाही, पर्यायाने नियमीत कर भरणारे हतोत्साहीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | | | |

आणि,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम ७ (२) नुसार महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर आकारणीस पाण संयंत्र व यंत्रसामग्री यांना मलमत्ता कर आकारणी करण्याची तरतुद असुन, त्युनसार यापुर्वी भांडवली मुल्याधारीत पध्दतीने कर आकारणी नियम व भारांक नियमात जाहिरात फलक होर्डीग व मोबाईल टॉवर यांना कर आकारणी करण्याची मान्यता दिली आहे. त्याशिवाय खालील यंत्र व संयंत्र सामुग्रींना कर आकारण्यास मान्यता देण्यात येते. ही यंत्र सामुग्री महानगरपालिका मालमत्तेवर असेल तर त्याची जागा भाडे दर निश्चीती मालमत्ता व नगर रचना विभागाने करून द्यावी, खाजगी मालमत्तेवर ही यंत्र सामुग्री असेल व त्यांचा लेखी भाडेकरार झालेला असेल तर त्या भाडेदराने अथवा महानगर पालिकेने निश्चीत केलेले भाडे दर याअधारे कर आकारणी किंवा मुल्याधारीत कर आकारणी या दोहोपैकी जी कर रक्कम अधिक असेल, ती कर रक्कम वसुल करावी, तसेच सदरील संयंत्रांना अनिवासी दराने कर आकारणी करण्यात यावी.

| अनु.क्र. | यंत्र व संयंत्र | शेरा |
|---|---|---|
| १ | विद्युत पुरवठा नियंत्रण डी.पी., | |
| २ | मोबाईल केबल, केबल टी.व्ही, नेटवर्क केबल, इंटरनेट अंडर ग्राउंड केबल व र्स व्यवसायीक ओव्हर हेड केबल, | |
| ३ | इंटरनेट टॉवर व इलेक्टॉनिक जाहिराती फलक | |
| ४ | विद्युत खांब व टेलीफोन खांब. | |

करीता मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग क्र. ११ मध्ये वसंतनगर भागात श्री. कंकाळ यांचे घर ते पार्डीकर याचे घरापर्यत सिमेंट रस्ता करणेसाठी मा. आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता अस्तित्त्वातील रस्ता ड्रेनेज लाईनमुळे मोठया प्रमाणावर नादुरुस्त झाले असुन सदर ठिकाणी मा. मंत्री महोदय भेट देणार असल्याने रस्ता करणे गरजेचे असमुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुचि २०१३-१४ नुसार रु. ८,२२,०००/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. कामाची निकड, तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पद्धतीने अंदाजपत्रक दरावर मे. शिवाजी इंगळे नांदेड या कंत्राटदाराकडून करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. ८,२२,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत झोन क्र. १ व ६ अंतर्गत येणारे शॉपींग कॉम्प्लेक्स, अभ्यासिका, व्यायमशाळा, स्टाफ रुम, अंगणवाडी तसेच मालमत्ता क्रमांक च्या दिलेल्या कामाचे डिझाईन, नकाशे, स्ट्रक्चरल ऑडीट करणे श्री. सि.एन. कुऱ्हे (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांचे कडुन तयार करुन घेण्यात आले असुन ते खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित ढवळे कॉर्नर येथे शॉपींग कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे. | रु. १५४२५/- |
| २) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित सिडको येथे लॅबरी व अभ्यासिकाचे बांधकाम करणे. | रु. ३३४१२/- |

| | |
|---|---|
| ३) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित खालसा हॉयस्कुल येथे व्यायामशाळेचे बांधकाम करणे. | रु. १४८६३/- |
| ४) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित डंकिन कोटीतीर्थ येथे स्टाप रुमचे बांधकाम करणे. | रु. ५६१८/- |
| ५) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित वजिराबाद येथे हुतात्मा स्मारक चे डिझाईन तयार करणे. | रु. २५०००/- |
| ६) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित सिडको येथे आंगणवाडी करणे. | रु. ५६२५/- |
| ७) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित तरोडा नाका येथे भाजी मार्केट तयार करणे. | रु. ६२८८९/- |
| ८) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित हिंगोली रोड येथे शॉपींग सेंटर (डि.पी. साईट नं. A -५) बांधणे. | रु. ३७२५६/- |
| ९) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित राजीव गांधी मार्केट नवा मोंढा **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ११८९८/- |
| १०) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित जनता मार्केट शिवाजीनगर **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ४६४९४/- |
| ११) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित संत रविदास मार्केट इतवारा **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. २००१९/- |
| १२) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित हरीहरराव सोनुले मार्केट गोकुळ नगर **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. २८४३६/- |
| १३) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रायमरी स्कुल जंगमवाडी **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ११२३६/- |
| १४) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित माता गुजरीजी विसावा उद्यान येथे फिश ऑक्वारीयम **(स्ट्रक्चरल डिझाइन)** करणे. | रु. ११२३६/- |
| १५) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित घर क्र. २-९-२३२ दिनेश व नरेश रा. सोमेश कॉलनी नांदेड **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ५६१८/- |
| १६) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित घर क्र. ४-५-४१५ जुना मोंढा नांदेड **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ५६१८/- |
| १७) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित शंकरराव चव्हाण मार्केट जुने आयुर्वेदीक कॉलेज नांदेड **(स्ट्रक्चरल ऑडीट)** करणे. | रु. ५६१८/- |
| १८) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित MPRTC बिल्डींग प्रायमरी स्कुल लेबर कॉलनी नांदेड **(स्ट्रक्चरल डिझाइन)** करणे. | रु. ९८०४/- |

कामाची तातडी, निकड लक्षात घेता सदरचे काम श्री. सि.एन. कुन्हे (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांचे कडुन करुन घेण्यात आले असुन त्यासाठी लागणारी रक्कम रु. ३,५६,०६५/- हि श्री. सि. एन. कुन्हे (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांना अदाई करण्यासाठी कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरीकरिता मुंबई मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र.६**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित गोकुळनगर येथील जुन्या कोडवाडयाचे कै. हरीहरराव सोनूले दुकान केंद्राच्या पहिल्या मजल्यावरील पाठीमागची भिंत कोसळल्यामुळे नूकसान झाले आहे. सद्यस्थितीत पहिला मजल्याच्या भिंती पुर्ण पुणे पाडण्यात आली. जुन्या कोंडवाडयाच्या शेडचे पत्रे, लोखंडी पाईप इत्यादी वापरुन त्याच ठिकाणी पुनश्च शेड उभारण्या बाबत विभागाचे उप अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन रु. ३,८४,२००/- चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम AMRC किंवा इतर मंजुर कंत्राटदारा मार्फत करुण घेणेच्या मान्यतेस्तव सादर केले असता त्यास मा. आयुक्त मान्यता प्रदान केली. कामाची निकड लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पद्धतीने अंदाजपत्रक दरावर सोहेल कंन्स्ट्रक्शन ॲण्ड स्टिल

वर्क नांदेड यांचेकडून पुर्ण करुन घेण्यात आले असुन झालेला खर्च रु. ३,८४,२००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महामनगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.७**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत दशमेश नगर भागात नव्याने बांधण्यात आलेल्या नालीवर स्लॅब टाकणे व उर्वरीत सिमेंट रसता करणे, आवश्यक असल्याने संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी स्थळ पाहणी करून आवश्यक त्या बाबीचा समावेश करून रूपये ७,५७,०००/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदरील काम त्वरीत करणे आवश्यक असल्याने कामाची तातडी पाहता निविदा न मागविता रास्त पध्दतीने अंदाजपत्रकीय दरावर स्वास्तीक कंन्स्ट्रक्शन नांदेड यांच्याकडून काम पूर्ण करून घेण्यात आलेले आहे. करीता दशमेश नगर भागात नव्यने बांधण्यात आलेल्या नालीवर स्लॅब टाकणे व उर्वरीत सिमेंट रस्ता करणेच्या कामावर झालेला खर्च रूपये ७,५७,०००/- (अक्षरी रूपये सात लक्ष सत्तावन्न हजार फक्त) यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजूरीस्तव व सदर काम निविदा न मागविता रास्त पध्दतीने स्वस्तीक कंनस्ट्रक्शन नांदेड यांचे मार्फत करून घेण्यात आले त्यास मंजूरीस्तव मुंबई मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या श्री गुरुगोबिंदसिंग स्टेडियम मधील बॅटमिंटन हॉलचे नूतनीकरणाचे काम पूर्ण होऊन दि.१०/२/२०१४ रोजी मा.पालक मंत्र्यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.सदरील बॅटमिंटन हॉलमध्ये मध्ये नविन (२०) नग सिस्का कंपणीचे एनर्जी एफिशियंट एल.ई.डी.दिवे बसवून चांगली प्रकाश व्यवस्था करुन देण्यात आले आहे. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता कंपणीच्या दरावर मे.ओम सेल ॲन्ड सर्व्हिसेस नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.७०००००/- (अक्षरी रु.सात लाख फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनूसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**विषय क्र.९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड अंतर्गत एनआरएपी पंपींग स्टेशन येथील पंपींग मशिनरी ३०० एच.पी. व्ही.टी. पंप क्र. ३ व १५० एच.पी. पंप क्र. २ तसेच व्हॉल्व दुरुस्ती करणे अत्यावश्यक होते. कारण गोदावरी नदरीकाठची १२०० एमएम ची मलवाहीनी पंपींग मशिनरी बंद असल्यामुळे लाईन ओव्हर फ्लो होऊन नदीचे पाणी दुषित होत होते. पंपींग स्टेशन मधील पंपाची पाहणी केली असता ३०० एच.पी. चा पंप क्र.३ व १५० एच.पी. चा पंप क्र.२ पंपाचे नादुरुस्त पार्टस दुरुस्त करणे आवश्यक होते. ६ञञ एमएम चे ४५० एमएम चे ईनलेट आऊटलेट व्हॉल्व दुरुस्तीचे ही कामे सिलींग दराने मे.हकीम इंजी. वर्कस यांचे मार्फत करून घेण्यात आले. तरी मंजूर सिलींग रेट प्रमाणे अंदाजपत्रक रू. २,९९,०६६/- (अक्षरी रूपये दोन लक्ष नव्यान्व हजार सहासष्ट फक्त) ला कार्यात्तर प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्रदान करणे करिता स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.१०**

BSUP योजनेअंतर्गत गोवर्धन घाट भागातील घरकुल बांधकामाचे रेखाकंन अपिल कंन्सलटान्ट यांनी दिले होते. पाईल फाऊडेंशन पर्यंत काम पूर्ण झाल्यानंतर अपिल कंन्सलटंन्ट यांनी BSUP प्रकल्पावर नियंत्रण ठेवणे थांबविले होते. त्यावेळेस वारंवार मागणी करूनही अपिल यांनी स्टील डिझाईन मनपास दिले नाही, व कंत्राटदार पुढील डिझाईन देणेसाठी महानगरपालिकेकडे तगादा लावत होता कंत्राटदारास वेळेत डिझाईन न दिल्यास निविदा अटी व शर्ती नुसार कंत्राटदारास नुकसान भरपाई देण्याची शक्यता असल्याने व सदरील बाब महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने नांदेड मध्ये उपलब्ध स्ट्रक्चरल कंन्सलटंन्ट श्री सि.एन कुन्हे यांचेकडून पुढील कामाचे स्टील डिझाईन घोऊन कामास सुरुतात करण्यात येऊन कामाची प्रगती कायम ठेवण्यात आली त्यामुळे आज सदरील घरकुलाचे आरसीसीचे चौथ्यामजल्या पर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. सदरील शिल्लक कामाचे स्टील डिझाईन करिता यांनी रू.४,१४,१८५/- (रू. चार लक्ष चौदा हजार एकशे पंच्याऐंशी) केवळ चे देयक सादर केले आहे.

करीता श्री सि.एन. कुन्हे यांचे स्टील डिझाईन पोटीचे शुल्क रू.४,१४,१८५/- (रू. चार लक्ष चौदा हजार एकशे पंच्याऐंशी) अदा करणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

**विषय क्र.११**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसा सहाय्यक आयुक्त (भांडार) यांनी सादर केलेल्या रूपये २६,५००/- (अक्षरी रूपये सहवीस हजार पॉचशे फक्त) ची जनसंपर्क विभागाला कार्यालयीन कामा करिता लागणारा Samsung Tab३ एम.एन. इंटरप्राईजेस, यांचे कडुन मार्केट दरावर खरेदी केलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येते. हा खर्च सालसन २०१३-१४ च्या अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकातील संबंधीत प्रमुख लेखामध्ये ठेवण्यात आलेल्या शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्र.१२**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसा सहाय्यक आयुक्त (भांडार) यांनी सादर केलेल्या रूपये ६५,०००/- (अक्षरी रूपये पासष्ट हजार फक्त) ची नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची

दिनदर्शिका-२०१४ मे. क्रियटिव्ह आर्टस, नांदेड यांचे कडुन छपाई करुन घेतलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येते. हा खर्च सालसन २०१३-१४ च्या अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकातील संबंधीत प्रमुख लेखामध्ये ठेवण्यात आलेल्या शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्र.१३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयातील सिसिटीव्ही कंट्रोलरुमच्या ठिकाणी कंट्रोलरुमसाठी टायलेट ब्लॉकचे बांधकाम व किरकोळ दुरुस्ती करणेसाठी मा. आयुक्त व मा. उप आयुक्त (महसुल) यांनी आदेशीत केल्याप्रमाणे या विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी स्थळ पाहणी करुन आवश्यक त्या बाबीचा समावेश करुन रुपये २,५५,९४२/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने व कामाची तातडी पहाता निविदा न मागविता रास्त पध्दतीने अंदाजपत्रकीय दरावर मे. श्री साई कंन्स्ट्रक्शन नांदेड यांच्याकडून काम पूर्ण करुन घेण्यात आलेले आहे. करीता जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयातील सिसिटीव्ही कंट्रोलरुमच्या ठिकाणी कंट्रोलरुमसाठी टायलेट ब्लॉकचे बांधकाम व किरकोळ दुरुस्ती करणेच्या कामावर झालेला खर्च रुपये २,५५,९४२/- (अक्षरी रुपये दोन लक्ष पंचावन्न हजार नऊशे बेचारीस फक्त) यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मंजूरीस्तव व सदर काम निविदा न मागविता रास्त पध्दतीने मे. श्री साई कंन्स्ट्रक्शन नांदेड यांचे मार्फत करुन घेण्यात आले त्यास मुंबई मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सादर.

**विषय क्र.१४**

सालसन २०१४-१५ या कालावधीकरीता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड इद्दीतील पारगमण शुल्क वसुली करणेसाठी अभिकर्त्याची नेमणुक करणे संदर्भात रू.९,३२,३६,२५०/- (अक्षरी नऊ कोटी बत्तीस लक्ष छत्तीस हजार दोनशे पन्नास केवळ) इतक्या किमान देकार रकमेची निवीदा सुचना e-tender द्वारे दि.१३.१२.२०१३ रोजी प्रसिध्दी करण्यात अली होती सदर निविदा सुचनेनुसार (दि.१३.१२.२०१३ ते २७.१२.२०१३) पर्यंत एकच निविदा प्राप्त झाली होती म्हणुन दुस४यांना जाहीर निविदा सुचना दि.०२.०१.२०१४ रोजी प्रसिध्दी करण्यात आली होती त्या मध्ये खालील चार निविदा प्राप्त झालेल्या आहे.

१. साईजिवन इन्फ्रा प्रोजक्टर प्रा.लि., सुमाशंकर फर्निचर, आनंद नगर रोड, नांदेड.

२. साईनाथ कंन्सट्रक्शन आदर्श चौक, लातुर

३. हनुमान खांडसरी शुगर मील्स, लातुर

४. मयुर इंन्टरप्राईज, मालेगाव जि, नाशिक

चार पैकी एक साईजिवन इन्फ्रा प्रोजक्टर प्रा.लि., नांदेड यांची इसारा रक्कमेचा (EMD) चा डी.डी. न देता त्यांनी धनादेश दिल्यामुळै सदरील त्यांची निविदा उघडण्यात आली नाही. तरी उर्वरीत तीन निविदा धारकाच्या निविदा मा. आयुक्त यांच्या परवानगीने उघडण्यात आलेली आहेत. तीनही निविदा धारक हे तांत्रिकदृष्टया पात्र ठरत असल्यामुळे त्यांच्या देकार रकमेच्या निविदा उघडण्यात आलेल्या आहेत.त्यामध्ये खाली प्रमाणे दर देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १. | साईनाथ कंन्स्ट्रक्शन आदर्श चौक, लातुर | रू.४,५९,९९,४५९/- |
| २. | हनुमान खांडसरी शुगर मील्स, लातुर | रू.४,३७,३७,०३७/- |
| ३. | मयुर इंन्टरप्राईज, मालेगाव जि. नाशिक | रू.६,०१,००,०००/- |

तरी वरीलपैकी मयुर इंन्टरप्राईज, मालेगाव जि. नाशिक यांचा दर सार्वाधिक असल्यामुळे मा. आयुक्त यांच्याकडे दि.११.०२.२०१४ रोजी त्यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते. वाटाघाटीअंती संबंधीत निविदाधारक यांनी रू.६,३०,००,०००/- एवढया देकार रकमेचे पत्र दिलेले आहे.दि.०१.०४.२०१३ पासुन पारगमणे शुल्काची वसुली महानगरपालिका कडून करण्यात येत असुन दि.०१.०४.२०१३ ते ३१.०१.२०१४ या कालावधीत पारगमण शुल्का पोटी रू. ४,२६,०७,७७९/- इतकी वसुली झालेली आहे.
यापुढे महानगरपालिकाकडून पारगमण शुल्काची वसुली सुरु ठेवल्यास मयुर इंन्टरप्राईज, मालेगाव जि. नाशिक यांनी वाटाघाटी अंती मान्य देकारा एवढी रक्कम वसुली होणे शक्य नाही. तसेच पारगमण शुल्क वसुली कामी (२६) कर्मचारी कार्यरत असन त्यांच्या वेतनावर प्रती महा रूपये ४,९८,२४४/- लक्ष खर्च होत आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन प्रतिदीन रूपये १९,१६३/- प्रमाणे वजा जाता निव्वळ उत्पन्न रू. १,२०,०७८/- इतके होत आहे. पारगमण शुल्क वसुली साठी देण्यात आलेल्या देकार रकमेपोटी दररोज १,७२,६०३/- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस महसुल प्राप्त होणार असुन सध्या स्थितीत येत असलेल्या रू.१,३९,२४१/- च्या तुलनेत दररोज रू.३३,३६२/- एवढा महसूल जास्तीचा प्राप्त होणार आहे व पारगमण शुल्क नाक्यावरील कर्मचारी इतर विभागाकरीता देखील उपलब्ध होऊ शकतील. करीता वरीलप्रमाणे वस्तुस्थिती पाहता महानगरपालिका हद्दीत पारगमण शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नुमणुकीसाठी मयुर इंन्टरप्राईज, मालेगाव जि. नाशिक यांनी वाटाघाटीअंती मान्य केलेल्या देकार रकमेच्या संदर्भात प्रकरण निर्णयास्तव सादर.

**विषय क्र.१५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या काबरानगर येथील जलशुध्दीकरण केंद्रा जवळील ३५ MLD येथील ६०० एम.एम.चे चार व्हॉल्व आणि ६० MLD ३०० एम.एम. चे १४ व्हॉल्व तसेच ६० MLD येथील २०० एम.एम.चे चार व्हॉल्व, तातडीने

दुरुस्ती करुन निकड लक्षात घेता सिलींग मंजूर दराप्रमाणे सदरील काम मे. हकिम इंजि. ॲण्ड मेकॅनिकल वर्क्स, नांदेड. यांचे दर मंजूर दरानूसार काम करुन घेण्यात आले. त्या कामाचा खर्च रु. १४७०८६/- संबंधित एजेंन्सीने कामाचे सादर केलेले देयक **रु. १४७०८६/- (अक्षरी रुपये एक लक्ष सत्तेचाळीस हजार श्याहांशी फक्त)** यास अदायी करणेसाठी कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करणे साठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.१६**

महानगरपालिकेत एकुण १ ते ६ झोन असून झोन अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत शाळा, दवाखाने, शॉपींग कॉम्प्लेक्स मंगल कार्यालय, स्टेडियम इत्यादी येत असून त्या सर्व इमारतीचे स्ट्रक्चरल डिझाईन करणे, रेखानकाशे काढणे साईटवर प्रत्यक्ष पहाणी करुन अभिप्राय देणे इत्यादी कामे नेहमी करावे लागतात. महानगरपालिकेकडुन बांधावयाचा इमारतीचे रेखा नकाशे नगररचना विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार तयार करणे, इमारतीचे Structural Design IS code व इतर तांत्रिक बाबीं तपासुन तयार करणे तसेच नांदेड शहर भुकंप प्रवण क्षेत्रामध्ये येत असल्याने भुकंपरोधक बाबींचा समावेश करुन इमारतीचे डिझाईन होणे आवश्यक असल्यामुळे महापालिकेस तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणे आवश्यक आहे. Structural Audit व Structural Design आणि building plan विभागा मार्फत करणे शक्य नाही त्यामुळे नेहमीच Cunsulting Engineer यांचेकडून करुन घेण्यात येतात. श्री. सी.एन. कुऱ्हे याच्याकडे इमारतीचे कामाचा खुप वर्षाचा अनुभव आहे. श्री. सी.एन. कुऱ्हे यांना मनपाच्या पॅनलवर घेतल्यास मनपा इमारतीची कामे गुणवंत्ता पुर्ण होतील.

श्री. सी.एन. कुऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या पॅनलवर Cunsulting Engineer (सल्लागार) म्हणुन घेण्याबाबत विनंती करुन दर दिले होते. दिलेले दर जास्त वाटत असल्याकारनाने त्याना वाटावाघाटीस पाचारण करुन दर कमी करण्यास कळविण्यात आले असता त्यानी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे दरावर काम करणेस लेखी संमती दिली.

| Services offered | Consultancy Charges |
|---|---|
| Structural Audit | Rs. १.३० / Sq.ft of Built up Area - Minimum Rs. ४००० / + Service Tax. |
| Structural Design | Rs. ५.०० / Sq.ft of Built up Area - Minimum Rs. ४००० / Service Tax. |
| Site Visit for Structural Design Checking (If needed) | Per Visit ड़ Rs. १०००/- + Service Tax. |
| Preparing Building Plans/ Estimates/ Designs | २.२० % Estimated cost + Service Tax. |

उपरोक्त प्रमाणे सि. एन. कुऱ्हे स्ट्रक्चरल इंजिनिअर नांदेड यांनी दिलेले दर मंजुर करुन त्यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर घेणेस मुबंई मनपा अधिनियिम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सादर.

**विषय क्र.१७**

नांदेड वाघाळा शहर मनपा पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाणी शुध्दिकरणासाठी निविदा सुचना **(दुसऱ्यांदा) दैनिक गोदातीर समाचार / दैनिक प्रभाव** या वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन **Online** पध्दतीने E-tendering व्दारे निविदा प्रसिध्द केली असता, सदर कामासाठी एकुण ( ३ ) तीन निविदा विक्री झाल्या व (३) निविदा स्विकृत झाल्या. त्या स्विकृत निविदाचा तांत्रिक लिफाफा त्रिसदस्यीय समितीसमोर उघडण्यात आल्या असता, तांत्रिक अर्हता तपासणी अंती प्राप्त ( ३ ) निविदेपैकी ( ३ ) निविदा पात्र ठरल्या असुन, पात्र निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा पार्श्वा असोशियटस नागपूर यांची असुन, ती ८,२००/- रु. प्रती मे.टनाप्रमाणे आहे. प्राप्त झालेले दर मागील वर्षाच्या दरापेक्षा ६००/- रुपये प्रती मे. टनाने कमी आहेत. मागील वर्षाचे दरापेक्षा यावर्षी तुरटी ग्रेड-१ साठी प्राप्त झालेले दराबाबत इतर महापालिकेत चौकशी केली असता, यावर्षीचे दर इतर महापालिकेच्या दरापैक्षा प्राप्त झालेले दर कमी आहे. त्यानूसार दर मान्य करणेसाठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर सादर. तसेच सदर कामासाठी वार्षिक मागणीनुसार ७०० मे.टन तुरटी ग्रेड -१ पुरवठयासाठी लागणाऱ्या खर्चास **रु.५४,४००००/- (अक्षरी-चौपन्न लक्ष चाळीस हजार फक्त)** रुपयास **रसायने खरेदी या लेखा शिर्षातुन प्र./आ.मान्यता प्रदान करणे योग्य**. तसेच मान्य केलेले दर हे करारनाम्याच्या दिनांकापासुन एक वर्षापर्यंत अंमलात राहतील व सदर रसायनांचा पुरवठा वेळेवर आवश्यक परिमाणानुसार होण्याकरीता गरज वाटल्यास एकुण परिमाण दोन निविदा धारकांमार्फत घेण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांनी राखुन ठेवला असुन, वेळोवेळी आवश्यकतेनुसार लागेल त्या नुसार घेण्यात येईल. या अटीवर निविदा मान्य करुन लागणाऱ्या खर्चास प्र./आ.मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच सद्या जलशुध्दीकरण केंद्रावर तुरटी चा साठा संपत असल्यामुळे तुर्त १०० मे.टन तुरटी ग्रेड-१ पुरवठा करण्यांसाठी पाणी शुध्दीकरण प्रक्रीयेमध्ये व्यत्यय निर्माण होऊनये म्हणून स्थायी समितीच्या दर मान्यतेच्या अपेक्षेवर तुर्तास १०० मे.टन तुरटी पुरवठा करुन घेण्यासाठी मान्यतेस्तव सादर. करीता सदर प्रस्ताव येत्या स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.१८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित Multipurpose High School ते नगीनाघाट पर्यंत रोडवर (१३)नग व गांधी पुतळा येथे (०४) नग असे एकूण (१७) नग Induction Street light Fittings पुरवठा करुन बसविण्यात आले आहेत. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता रास्त पध्दतीने कंपणीच्या दरावर SAS POWERTECH PUNE यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.२९६४३८/- (अक्षरी रु.दोन लाख शेअन्नव हजार चारशे अडोतीस फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनूसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर.

**विषय क्र.१९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित कौठा जुना परिसरातील नागरीकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता कौठा परिसरात खाजगी दुकान भाडेतत्वावर घेऊन तात्पुरत्या स्वरुपात दवाखाना सुरु करण्याकरीता सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६३ दि.२६.११.२००२ अन्वये मंजुरी दिल्यानुसार लातूर रोडवर कौठा भागातील श्री दत्तराम रामजी गोरे यांचे दुकान (क्षेत्र १२.६ बाय २२) दि.१३.०१.२००४ पासून तीन वर्षाकरीता भाडेतत्वावर घेऊन दवाखाना कार्यरत करण्यात आला.

दि.०४.११.२०११ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र.१९० नुसार दि.१४.०१.२०१० पासून पुढील तीन वर्षाकरीता रूपये २१०९/- वर करारनाम्यातील अटीनुसार १० टक्के वाढ करून भाडे तत्वावर घेण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली होती. परंतू सदर कालावधीची मुदत दि.१३.०१.२०१३ रोजी संपत असल्याने व कौठा भागात महापालिकेची जागा उपलब्ध नसल्याने दि.१४.०१.२०१३ पासून पुढील तीन वर्षाकरीता रुपये २३१९/- यावर करारनाम्यातील अटीनुसार १० टक्के वाढ याप्रमाणे मुदतवाढ घ्यावयाची आहे.

करीता प्रस्ताव स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्र.२०**

तत्कालीन लोकल फंड तसफीया कमिटी, नांदेड ने नांदेड एज्युकेशन सोसायटीस दि.३१.०७.१९५० रोजी कॉलेजसाठी विनामुल्य सर्वे नं.१७,१८,१९ व २०/१ मौज जंगमवाडी मधील लेबर कॉलनीसाठी संपादित केलेल्या जमिनी पैकी एकुण ३५ एकर जमिन शैक्षणिक कार्यासाठी विनामुल्य दिलेली आहे. नांदेड एज्युकेशन संस्थेने विद्यानगर को ऑप हाऊसिंग सोसायटीस १ हेक्टर ४४ आर विक्री केली हि बाब नांदेड महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यानंतर महानगरपालिकेतर्फे सदरील संस्थे विरुध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१-ब अन्वये कार्यवाही करुन दि.२८.०७.२००५ रोजी सदरील जागा रिकामी करुन महानगरपालिकेस ताबा द्यावा अशा प्रकारचा आदेश पारित केला होता. नांदेड एज्युकेशन सोसायटी व विद्यानगर गृहनिर्माण संस्था यांच्या तर्फे दि.०८.०७.२००५ च्या आदेशास मा. जिल्हा न्यायालयास आव्हान दिले होते. सदरील प्रकरणात निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला. नांदेड एज्युकेशन संस्थेने व विद्यानगर गृहनिर्माण संस्थेने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका ५२९०/२००६ व रिट याचिका ५३७३/२००६ दाखल केलेली असुन, सदरील याचिका प्रलंबित आहे. सदरील प्रकरणात मा. उच्च न्यायल खंडपीठ यांनी जैसे थे चा आदेश पारीत केलेला आहे. याबाबत संस्थेने केलेली चुक मान्य केली. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे संस्थेस सदर जागेवर काहीही काम (Development) करता येत नसल्यामुळे सदर प्रकरणात सहानुभूतीपूर्वक विचार करुन नांदेड एज्युकेशन सोसायटी आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या दोन्ही बाजूने वाटाघाटी करून सन्मानीय पध्दतीने मिटवून (Compromise) करण्यास संस्थेने विनंती केली. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे न्याय प्रविष्ठ असल्यामुळे महानगरपालिका कायदे सल्लागार यांचे अभिप्राय घेतले असता कायदे सल्लागार यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ मधील तरतुदीनुसार तडजोडीस प्रकरण मिटविता येते. असे मत दिले आहे. त्या अनुषंगने तडजोड करावे किंवा नाही मान्यतेस्तव/निर्णयास्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग क्र. ८ काबरानगर येथील जलशुध्दीकरणाच्या मोकळया जागेत शॉपींग कॉम्प्लेक्स बांधकाम करणे. अंदाजपत्रक (रु. २,९४,९२,०००/-) साठी ई-टेंडर सेल द्वारे निविदा सुचना क्र. साबांवि/२२६९७/२०१३ दि. ११.१२.२०१३ अन्वये दै. दिव्य मराठी/गोदातीर समाचार या वर्तमान पत्रात दि. १३.१२.२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकुण ३ (तिन) निविदा प्राप्त झाल्या पात्र निविदा त्रीसदस्यीय समीती समोर दि. १०.०२.२०१४ रोजी उघडण्यात आले. तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | मे. पृथ्वी कंन्स्ट्रक्शन नांदेड | ९.२०% जास्त दर |
| २ | शिवाजी इंगळे | १०% जास्त दर |
| ३ | निखीला कंन्स्ट्रक्शन नांदेड | ७.२० % जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **निखीला कंन्स्ट्रक्शन नांदेड** यांची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२० % जास्त दराची आहे. **निखीला कंन्स्ट्रक्शन नांदेड** यांनी भरलेले दर जास्त वाटत असल्याने दर कमी करण्यासाठी संबंधीतास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता वाटाघाटी अंती संबंधीत कंत्राटदाराने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करण्यास लेखी संमती दिली आहे. सालसन २०१३-१४ च्या दरसूचीनूसार तुलना केली असता १% जास्त दराची येत असल्यामुळे

विषयाकिंत कामाची **निखीला कंन्स्ट्रक्शन नांदेड** यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा २% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.२२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित बंदाघाट गुरुद्वारा जवळ रिक्रिएशन सेंटरचा विकास करणे (ॲम्पीथेअटर) करिता चे अंदाजपत्रक रु. ९२,२३,१५०/- यास कार्यालयीन आदेश क्र. /१३७२/२०१२ दि. ०८.०२.२०१२ अन्वये प्रशासकीय व आर्थीक मंजुरी देवुन मे. प्रविण कंन्स्ट्रक्शन नांदेड याची वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा ३.१३% जास्त दराची निविदा मंजुर करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले. उक्त काम करत असतांना मुळ अंदाजपत्रकात काही बाबींचा वाव कमी असल्यामुळे प्रत्यक्षात काम करीत असतांना कामाच्या वावात वाढ होवुन रु. २८,२८,०६५/- ची वाढ झालेली आहे. तसेच कामाच्या वावात काही बाबींचा समावेश नसल्याने अतिरिक्त बाब रु. १०,७७,४००/- चे काम करुन घेण्यात आले. सदरील कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय किंमत अतिरिक्त बाबींसह रु. १,३१,२८,६१५/- इतकी होत आहे. अतिरिक्त बाबीं रु. १०,७७,४००/- चे समावेश करुन रु. १,३१,२८,६१५/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन सादर करण्यात आलेले आहे. जे की मुळ अंदाजपत्रक दरापेक्षा ३९,०५,४६५/- ने जास्त होत आहे. करिता सुधारीत अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह रु. १,३१,२८,६१५/- यास प्रशासकीय व आर्थीक मंजुरीस्तव व सदर काम पुर्वीच्याच मंजुर दरावर पुर्वीच्याच कंत्राटदारामार्फत करुन घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर सादर.

Sd/-
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा नांदेड.

Sd/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा नांदेड.